# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 29/09/2015 रोजी (दि.28/9/15 ची तहकूब सभा-का.प.क्र .8) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 29 सप्टेंबर 2015 (दि.28/9/15 ची तहकूब सभा-का.प.क्र.8) रोजी मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-45 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
07. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
08. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
09. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
10. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
11. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
12. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल :भा.ज.प.नेते, ठाणे-कल्याणचे माजी खासदार तथा अंदमान निकोबारचे माजी नायब राज्यपाल श्री.रामभाऊ कापसे यांचे दु:खद निधन झाले श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.मकरंद कुलकर्णी :अनुमोदन आहे.

मा.सभापती :ठिक आहे श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी स्व. रामभाऊ कापसे यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.सभापती :स्मार्ट सिटी संदर्भात पीएमसी नेमायचा प्रस्ताव आहे.माहिती होणे आवश्यक आहे. पीएमसीचे संबधीत अधिकारी यांनी प्रेझेंटेशन करावे, त्यानंतर प्रश्न सदस्यांनी विचारावे.

श्री.विकास एडके :गणपती उत्सव व ईद हे दोन्ही उत्सव एकाच वेळी आले व शहरात कुठेही ट्राफिक थप्प होणार नाही यासाठी मा.पोलीस आयुक्त यांनी दखल घेतली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे.

श्री.गजानन बारवाल :मा.पोलीस आयुक्त यांचे वाढदिवसही आहे त्यांनी वाहतुकीला अडथळा येणार नाही अशी कार्यवाही केली त्याबध्दल त्याचे अभिनंदन करावे.

मा.सभापती :सभागृहाच्या वतीने मा.पोलीस आयुक्त यांचे अभिनंदन करतो.आता स्मार्ट सिटीच्या संदर्भात प्रेझेंन्टेशन सुरू करावे.

या वेळी संबधीत एजन्सीचे अधिकारी श्री.भोरे यांनी सभागृहात स्मार्ट सिटी संदर्भात प्रेझेंन्टेशन नुसार माहिती दिली.

श्री.गजानन बारवाल :बेसीक मुद्दे माहित झाले पीएमसी नेमायचा मुद्दा असला तरी काही गोष्टी यात समावेश करण्याची गरज वाटते. स्मार्ट सीटी म्हणजे काय कशा प्रकारे होणार, कोणते नियोजन करणार सर्व माहिती होणे अपेक्षीत आहे.मुळात महापालिकेचे काम कसे चालते सर्वांना जाणीव आहे.खाजगी बस सेवा चालू केली, उदयान समोर ब्रीज केला फायदा होत नाही.बाबा पेट्रोल पंप येथील पुल कुठे पाहिजे व कुठे होत आहे माहिती घेतली तर वेगळेच चित्र दिसेल. सिध्दार्थ गार्डन शहराच्या एका साईडला त्यापेक्षा मोठे गार्डन शहरात कुठेच नाही स्वीमींग पुल बंद आहे. चांगल्या सुविधा नागरीकांना मिळायला पाहिजे.राज्य शासन व केंद्र शासनाच्या योजना आणण्याचा सर्वांनी प्रयत्न केला.योजना आल्या पीएमसी नेमल्या परंतु पीएमसी काय काम करते ऑफिस कुठे माहिती नाही. भाजी मार्केट टपरी मार्केट कुठे असणार आहे शिक्षणाचा दर्जा खालावला मनपाच्या मालकीच्या इमारती असून शाळेत विदयार्थी संख्या कमी आहे.कारखाने व्हावे पर्यटक यावे नगररचना विभागाचे नियम येथे वेगळे व इतर शहरासाठी वेगळे आरोग्य सुविधा योग्य प्रकारे मिळत नाही बाबतीत काय करणार आहे सर्व माहिती होणे आवश्यक आहे.

श्री.नितीन चित्ते :स्मार्ट सिटी सारखा प्रोजेक्ट सुरू केला त्याबध्दल मा.पंतप्रधान श्री.मोदी साहेब तसेच मा.नायडू साहेब यांचे अभिनंदन करावे चांगली सुरूवात झाली.पीएमसी काय असते आज समजले.यांनी डेटा कलेक्शन केले स्टडी करणार आहे.शहरात राज्य व केंद्र शासनाचे प्रोजेक्ट चालू आहे या विषयी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून काय नियोजन असणार आहे.समांतर पीएमसी नेमली पाणीपुरवठ्या विषयी या पीएमसीचे काय धोरण असणार आहे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :500 कोटीत विकास होणार का? की नागरीकांवर नंतर बोजा पडणार आहे. अनेक कंपन्या बंद पडल्या, पाणी टंचाई आहे रोजंदारी कमी झाली. गुंठेवारी, स्लम अल्पसंख्याक वस्ती आहे येथे सुविधा मिळत नाही मनपाची जबाबदारी असतांना सुध्दा दखल घेत नाही. आरोग्य, स्वच्छतेच्या बाबतीत अनेक तक्रारी फवारणी होत नाही. बजेट नुसार 200 कोटी मिळणार त्यातून 4-5 वार्डात विकास होऊ शकतो. स्मार्टसिटीसाठी किती जागा पाहिजे किती वस्तीमध्ये विकास होणार हे लोकल बॉडीने ठरवावे, स्मार्ट सिटी कशी व्हायला पाहिजे याचा विचार करावा. बाबा पेट्रोल पंप, रेल्वेस्टेशन पार्कीगची व्यवस्था मोडीत निघाली.लोकसंख्येनुसार कोणते व किती मार्केट असावे.किती दूर असावे.हे दाखवले नाही मनपाच्या शाळेचा दर्जा सुधारला पाहिजे.पार्कीग कुठे असणार. जायकवाडीहून पाणी कमी येते तर जास्तीचे पाणी कोठुन आणणार गूंठेवारी अधिनियम कायदा 2001 नुसार या भागात सुविधा पुरवू शकतो परंतु 20 टक्के सुध्दा गुंठेवारी झाली नाही. योजना चांगली आहे परंतु अर्धवट काम होऊ नये सिव्हरेज लाईनचे काम चालू आहे मोठमोठया नाल्यास आजही घाण पाणी वाहते ते जो पर्यत बंद होत नाही तो पर्यत हे शहर स्मार्ट सिटीकडे गेले असे म्हणता येणार नाही.

श्री.विकास एडके :पीएमसी काय करणार दाखविले.मनपाचे उत्पन्न कसे वाढणार व स्लम गुंठेवारी भागासाठी काय योजना असणार आहे.

श्री.मोहन मेघावाले :सिडको हडकोत 100 टक्के कर भरणारे नागरीक आहे.स्वामी विवेकांनद उदयानची 38-40 एकर जागा तेथे काय विकास होणार आहे एन-12 एसटीपी

प्लॅन्ट केला अजूनही घाण पाणी सरोवात जाते.त्यासाठी काय करणार आहे. या सरोवरात स्वीमींग टँक करावे अशी माझी सुचना आहे. शहराच्या मध्यवस्तीत येते.

श्रीमती समीना शेख :ऐतिहासीक शहर म्हणून आदराने संबोधले जाते. पर्यटन स्थळाची अवस्था दयनीय आहे पर्यटक संख्या कमी होते यासाठी काय कार्यवाही पीएमसी करणार. रस्त्यावरील धार्मीक स्थळा जवळील ट्राफिक कशी कमी करता येईल ते करावे.

श्री.मकरंद कुलकर्णी :सिडको हस्तांतरणाच्यावेळी गरवारे जलतरण तलाव, मा.बाळासाहेब ठाकरे बॉटनिकल गार्डन व संत तुकाराम नाटयगृह या वास्तू हस्तांतरीत झाल्या त्यांची अवस्था वाईट आहे. नाटयगृहाच्या ठिकाणी सुरक्षा होत नाही. बॉटनिकल गार्डन म्हणून आजपर्यत काहीच केले नाही या तीनही प्रोजेक्टसाठी स्मार्ट सिटी अंतर्गत काय विकास करणार आहे.

श्री.इरशाद खान : 50 एकर रि-डेव्हलपमेंन्ट करणार असे म्हटले जुन्या शहरात मोठा भाग येतो आणखी यासाठी जागा वाढवावी. हॉस्पीटल तसेच शिक्षणासाठी जागा वाढवावी.

श्री.रावसाहेब आमले :स्मार्ट सिटी मुळे विविध करामध्ये वाढ होणार का व दुग्ध व्यवसायीक ज्यांचेकडे गाई म्हशी असेल गोठयासाठी काय व्यवस्था करणार आहे.

श्री.मोहन मेघावाले :चिकलठाणा परीसरात यासाठी जागा घेतली तेथे अतिक्रमण होत आहे म्हशीच्या दुधाची या शहरातील नागरीकांना गरज आहे.

श्री.कमलाकर जगताप :मोक्ाट कुत्र्याचे काय नियोजन करणार आहे. ते यात असावे.

अभियंता (पीएमसी) :स्पेशल परपज व्हेयीकल तयार केले जाणार यासाठी सचिव दर्जाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यरत असणार आहे.स्मार्ट सिटी मार्फत हे सर्व बघणार आहोत. यात महापालिकेचे दोन रि-प्रेझेन्टेटयूव्ह असतील व 12 मेंबरची कमेटी असेल स्टेट होल्डर त्यात औदयोगिक हेल्थचे होल्डर असतील हा प्लॅन्ट इम्प्लीटेशन करण्यासाठी स्पेशल परपजव्हेयीकल असेल आणि तो इम्प्लीमेन्ट केले जाईल येणारे पैसे हे महापालिकेकडे न जाता स्पेशल परपज व्हेकल मध्ये जाणार आहे. प्रपोजल फायनल होईल व पैसे येण्याची वेळ व स्पेशल परपज व्हेकल व कंपनी कन्फॉर्म झाल्या शिवाय पैसे येणार नाही. हा कॉमन मुद्दा आहे. हा पाच वर्षाचा प्रोग्राम असल्यामूळे एवढे इम्प्लीमेंन्ट करू शकतो. मोठा प्लॅन हा 4-5 वर्षा ऐवजी 20 वर्ष चालतो यात 50 एकर जमीन कमीत कमी असावी असे म्हटले यापेक्षा जास्त जमीन घेऊ शकतो.हे अगोदर दृष्य स्वरूपात केले तर चांगली वाटचाल होते असे दिसेल व विकास करायला सर्वांना आवडेल.स्मार्ट सिटी मध्ये सर्व सेवा सुविधा दयाव्याच लागतात हेल्थ केअर मध्ये नुसते डॉक्टरकी नव्हे तर मोक्ाट कुत्रे वगैरे विषय येतो हा मनपामध्ये विभाग असतो सॉलीडवेस्ट मेनेजमेंन्ट हे हेल्थ विभाग संबधीत येते. सुरतमध्ये कचरा न उचलल्यामूळे प्लेग झाला त्याचा परीणाम म्हणून आज तेथे कुठेही कचरा दिसून येत नाही.पॅन सिटी मध्ये सर्व येईल हा ढोबळ प्लॅन आहे. पुन्हा 15 दिवसानी सजेशन घेऊन फायनल प्लॅन काय आहे याची माहिती दिली जाईल.

श्री.ईरशाद खान :जुन्या ऐतिहासीक वास्तु जसे, पानचक्की, बेबीका मकबरा संबधी काय नियोजन असणार आहे.

मा.सभापती :.कोणत्या पध्दतीने करू शकतो सजेशन दिले. निर्णय महापालिकेला घ्यायचा आहे.

श्री.गजानन बारवाल : नारेगाव येथील सॉलीड वेस्ट संदर्भात नियोजन करावे मनपाच्या जागा विकसीत करण्यासाठी काय करणार आरोग्य व शिक्षण या मुलभूत सुविधा कडे प्रामुख्याने लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :पीएमसीचे कार्यालय कर्मचारी अधिकारी कुठे राहणार आहे माहिती दयावी.

अभियंता -पीएमसी :ग्रुप पध्दतीने तसेच वार्डवाइज आणि सर्वसामान्य नागरीक व स.सदस्य व कर्मचारी अधिकारी यांचेकडून माहिती घेऊन वेबसाईटवर स्पेशल माहिती तयार होईल ऑफिस व कर्मचारी अधिकारी असतील महापालिकेत एक पीएमसीचे ऑफिस असेल.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :पाणी पुरवठा व ड्रेनेजची कामे एकच कंपनी करीत आहे. यांचे स्वतंत्र ऑफिस असावे.

श्रीमती कमल नरोटे :गुंठेवारी कायदयाची मुदत वाढवून 2005 पर्यंत करणेकरीता राज्य शासनाकडे तशी मागणी करावी व त्यानुसार स्मार्ट सिटी मध्ये या भागात कामे व्हावी.

मा.सभापती :गुंठेवारी स्लम व झोपडपट्टी भागात काय विकास करता येईल. त्याचाही विचार करावा लागणार आहे.

अभियंता-पीएमसी :केंद्र शासनाचे धोरण असे की रि-डेव्हलपमेंन्ट मध्ये कुठे बसते ते बघा स्लम भाग हा रि-डेव्हलपमेंन्टमध्ये व गुंठेवारी हे रेट्राफिकेशनमध्ये करावा करता येईल लागेल जे की इमारती पाडायच्या नाही मुलभुत सुविधा तेथे देता येईल कोणता प्रोजेक्ट व कुठला एरिया घ्यायचा हे निश्चित करावे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :शहराच्या कुठल्याही भागात 40 टक्के् गुठेवारी व 10 टक्के स्लम भाग आहेतच तर रि-डेव्हलपमेन्ट कसे करणार.

मा.सभापती :प्रेझेंन्टेशन केले सर्व माहिती जनतेसमोर जाणार आहे पीएमसीने सर्व तयारी केली. प्रेझेन्टेशन संपले आहे यावर चर्चा करण्यात येईल 10 मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ 1.10 पुन्हा सभा 1.30 वाजता सुरू)

श्री.नितीन चित्ते :अनुसुचित जाती नवबौध्द भागात शौचालय बांधण्याची शासनाची योजना आली होती तीन वर्षात तीन आयुक्ताच्या काळात पीएमसी नेमणे शासनाची मान्यता आणणे हे काम झाले. योजनेत प्रशासनाकडून विलंब होत गेला 30 लक्ष शासनाकडे भरले नाही म्हणुन तो निधी आला नाही. या कामात वेगवेगळे टप्पे झाले पीएमसीला पैसे दिले संचिकेमध्ये या सर्वेक्षणास 5 लक्ष खर्च येईल असे म्हटले उपआयुक्त श्री.कांबळे यांनी त्यावेळी पीएमसी नेमावे असा शेरा दिला त्यानंतर पीएमसी नेमली पीएमसीला 6 टक्के देण्यात यावे असे ठरले किती टक्के पीएमसीला दयावे शासनाचे नियम असतील 27 कोटीत योजना अंतिम केली 30 लक्ष भरायचे होते पीएमसीला 48 लक्ष दिले 2.25 टक्के प्रमाणे दयायला पाहिजे होते 28 कोटीच्या अगेन्स्ट एजन्सीला 6 टक्के प्रमाणे दिले 30 लक्ष शासनास का भरले नाही.

उपआयुक्त (मा.म) :2009 ला स्कीम सुरू केली यासाठी 6.75 लक्ष खर्च येईल असे सादरीकरण केले होते.पीएमसी नेमण्यासाठी टेंडर काढले 6 टेंडर आले सुशिक्षित बेरोजगार व संस्था यांनी 10,7,9 टक्के प्रमाणे दर भरले वाटाघाटी करून 6% देण्याचे ठरले. 2011 ला करारनामा केला वर्कऑर्डर दिली.कामास सुरूवात केल्यास 10 टक्के व रिपोर्ट सादर करून मान्यतेसाठी पाठविल्यास 30 टक्के असे तीन टप्पे केले त्यानुसार काम सुरू केले 2014 मध्ये प्रोजेक्ट रिपोर्ट गेलेला आहे.करारनामा करतांना सहा महिण्याची मुदत दिली होती. मा.आयुक्त श्री.कांबळे साहेबाच्या काळात हा प्रोजेक्ट पाठविला चार टप्प्यात 48 लक्ष पेमेन्ट दिले आहे.

श्री.नितीन चित्ते :20-9-2014 रोजी आयुक्तांनी पत्र दिले प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छताकडे पैसे भरावयाचे होते. 2011 मध्ये स्थायी समितीने मंजूरी दिली त्यानंतर स्लॅब नुसार करारनामा केला त्यावर शहर अभियंता यांची सही आहे.तीन आयुक्तानी काम केले.30 लक्ष शासनाकडे का भरणा केले नाही.

उपआयुक्त (माम) :टेंडर काढले त्यात एकूण प्रोजेक्ट कॉस्ट किती आहे एजन्सीला किती दिले पाहिजे उल्लेख नाही सचिका मागून घेवून माहिती घेतली जाईल.

मा.सभापती :6 टक्के नुसार एजन्सीला काम दिले का ?

मुख्य पशुसंवर्धन अधि. :मा.आयुक्तांनी पत्र काढले कन्स्ल्टंन्टचे पॅनल नेमले काम कुणाकडून करुन घ्यायचे शहरातील 8 आर्कीटेक्टचे पॅनल मनपाच्या पॅनलवर घेतले होते. त्याचा रेट 2.25 टक्के ठरविला त्या रेटने देऊ शकतो.

श्री.नितीन चित्ते :तीन आयुक्ताच्या सचिंकेवर सहया आहे. शासनाकडून जे पैसे मिळणार होते ते मिळाले नाही 30 लक्ष शासनाकडे का भरले नाही तसेच करारनामा सुध्दा 1 पेजेसचा केला. पीएमसीला 48 लक्ष दिले शासनाकडून पैसे मिळाले नाही.30 लक्ष न भरल्यामूळे हा प्रकार झाला यास जबाबदार कोण माहिती दयावी.

मा.सभापती :या संदर्भात एक सदस्यीय चौकशी समिती नेमून मुख्य लेखा परीक्षक यांनी चौकशी करावी 15 दिवसात माहिती घेऊन सर्व अहवाल या समितीसमोर ठेवावा. दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.गजानन बारवाल :मागिल बैठकीचे इतिवृत्त अदयाप मिळाले नाही.

नगरसचिव :15-7-2015 पासून इतिवृत्त प्रलंबीत आहे. तयार करण्याचे काम चालू आहे. पुढील सभेपर्यत इतिवृत्तांत मंजूरीसाठी दिले जाईल.

मा.सभापती :त्या त्या सभेचे इतिवृत्त वेळेवर देण्याची नगरसचिव यांनी कार्यवाही करावी एक स्टेनो कर्मचारी या विभागाकडे देण्यात यावे.

**विषय क्र. 16 :** (विषय क्र.12 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.24/08/2015 (का.प.क्र.07) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मालमत्ता विभागामार्फत शहरातील विविध रस्त्यावरील 15 जाहिरात कमानी (गॅन्ट्रीज) ची निविदा मागितल्या असता लेखा विभागामार्फत एकुण -13 निविदांची विक्री झाली, निविदा स्विकारण्याची तारीख दि.15/07/2015 पर्यंत होती. तथापी, अर्जदारांची मागणीनुसार बेबाकी प्रमाणपत्र व इतर बार्बीसाठी निविदेची मुदत दि.23/07/2015 पर्यंत वाढवुन देण्यात आली होती. त्यानुसार एकूण 11 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदा लक्ष्मी ग्राफिक्स व अभिषेक ॲडस यांच्या दोन निविदा कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याने उघडण्यात आल्या नाहीत. उर्वरीत 9 निविदा मुख्य लेखा परीक्षक व लेखाधिकारी यांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | आधारभुत किमंत प्रतिकमान/प्रतिमाह रू. | निविदा रक्कम प्रतिकमान/प्रतिमाह |
|---|---|---|---|
| 01. | इथॉस मिडीया | 5886/- | 22000/- |
| 02. | ड्रिम्स क्रिएशन | 5886/- | 21888/- |
| 03. | उपेंद्र पब्लिसीटी | 5886/- | 18000/- |
| 04. | द अल्ट्रा आऊटडोअर्स प्रा.लि. | 5886/- | 12999/- |
| 05. | आर.के. बाबु ट्रेडींग प्रा.लि. | 5886/- | 12501/- |
| 06. | ॲड स्पीरीटस् | 5886/- | 12031/- |
| 07. | टार्गेट ॲडस् | 5886/- | 12031/- |
| 08. | अल्ट्रा आऊट डोअर | 5886/- | 11888/- |
| 09. | सुमन मिडीया | 5886/- | 10800/- |

वरील तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्तीचे दर इथोस मिडीया यांचे असून त्यांचे दर 22000/- रू. प्रति कमान / प्रतिमाह (सेवा कर वगळून) असून सदर निविदा ही तीन वर्ष कालावधीसाठी असून पहिले वर्ष वगळुन उर्वरीत दोन वर्षासाठी प्रतिवर्ष 10 टक्के वाढ प्रस्तावित आहे. त्यानुसार मनपास तीन वर्षात खालीलप्रमाणे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | वर्ष | कमानींची संख्या | निविदा दर प्रति कमान / प्रतिमाह | वार्षीक उत्पन्न रू. |
|---|---|---|---|---|
| 01. | प्रथम वर्ष | 15 | 22,000/- | 39,60,000/- |
| 02. | दुसरे वर्ष | 15 | 24,200/- | 43,56,000/- |
| 03. | तिसरे वर्ष | 15 | 26,620/- | 47,91,600/- |
| | | | **तीन वर्षात एकूण उत्पन्न रूपये** | **1,31,07,600/-** |

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेस तीन वर्षात 1,31,07,600/- अक्षरी एक कोटी एकतीस लाख सात हजार सहाशे रू. मात्र (सेवा कर वगळून) प्राप्त होणार आहेत.करीता इथोस मिडीया यांची 22,000/-रू. प्रति कमान/प्रतिमाह दराची निविदा मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर, निविदा मान्यतेनंतर करारनामा करून कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :जाहिरात फलक किती व उत्पन्न कीती येते.

उपआयुक्त (मा.म.) :एकूण 18 जाहिरात एजन्सी काम करतात यात इंडिया स्पेशालिस्ट यांचेकडे 11.47 लक्ष ,व्यंकटेश ॲड 1.43 लक्ष ,कार्टेल आउट डोअर 12.93,सागराई कडे 2.91 लक्ष, नागपाल ग्रुप 87 हजार ,हिन्दुस्थान पेट्रोलियम 2.29 लक्ष, टीवीआर विन्डो इन्टरप्राईजेस 54हजार ,कापडीया सिने मार्केट 56700,सेलवेल ॲज 57800, टेलिकॉम सर्वीसेस 1,04,000,ईशा सर्वीसेस 26 हजार,आपकी जीवन एजन्सी 90 हजार,औरंगाबाद जीमखान एजन्सी 37125, रामा इंन्टरप्राईजेस 27 हजार ,प्रेसिडेंट पार्क लेमन्ट्री 68 हजार ,आदित्य ॲड 2,31 कोटी, जैस्वाल ॲड 1.71 लक्ष,वीथ ॲड 2.34 लक्ष. एकूण 44.51 लक्ष येणे आहे.या संदर्भात कार्यवाही सुरू केले मालमत्ताची कराची थकबाकी जप्ती करून वसुल करतो त्याप्रमाणे कार्यवाही करणार आहोत.

श्री.गजानन बारवाल :5-7 वर्षाची थकबाकी आहे बाकीच्या एजन्सीच्या बाबतीत काय कार्यवाही करणार आहोत.

उपआयुक्त(मालमत्ता) : 2 महिण्याची मुदत दिली.अंतिम नोटीस देऊन जप्तीची कार्यवाही करून निश्चित वसुली केली जाईल.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :एखादया घराच्या टेरेसवर बोर्ड लावण्याची परवानगी दिल्यास ती एजन्सी मनपाची परवानगी घेते का ?

उपआयुक्त-मालमत्ता :रितसर एजन्सीला परवानगी देतो हे लिगल घरासाठी आहे इलिगल असेल मनपाची परवानगी घेतली नसेल व होर्डिंग्ज लावण्यास तयार असेल तर रेग्युलर करून देता येते तसा ठराव घेतला आहे. त्यानुसार 68 संचिका तयार आहे.

श्री.अब्दुल नाइकवाडी : इमारतीवर इलिगल होर्डीग्ज 500 असतील टपरीवर 5x5 ची होर्डीग्ज लावण्याची परवानगी देता येते का?

उपआयुक्त-मालमत्ता :पुर्ण शहराचा सर्वे केला एक महिणा पुर्ण नियोजन करण्यासाठी लागेल.

श्री.गजानन बारवाल :परवानगी एक व होर्डीग्ज मोठया साईजची असते लक्ष दिले जावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एजन्सी व्यवस्थीत काम करीत नसेल तर मा.कोर्टात एजन्सी जाण्या अगोदर त्यांना ब्लॅकलिस्ट करावे.पुन्हा त्या एजन्सीला टेंडरमध्ये घेऊ नये.यातून मनपाचा महसूल वाढवावा.

मा.सभापती :सर्वे करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा.ही निविदा आलेली आहे चांगले रेट आहे. मागिल वेळेस स्थगित केले होते या संदर्भात मा.आयुक्तांनी चर्चा केली व यापेक्षा जास्त रेट येण्याची शक्यता नाही म्हणून पुन्हा प्रस्ताव आला विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध रस्त्यावरील 15 जाहिरात कमानी (गॅन्ट्रीज) साठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक इथॉस मिडीया यांना रू.22000/- प्रति कमान / प्रतिमाह (सेवा कर वगळून) देणेस तसेच सदर निविदा ही तीन वर्ष कालावधीसाठी असल्यामुळे पहिले वर्ष वगळून उर्वरीत दोन वर्षासाठी प्रतिवर्ष 10 टक्के वाढ याप्रमाणे देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 17 :**

कर निर्धारक व संकलक यांचेतर्फे प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनातर्फे औरंगाबाद शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा स्त्रोत वाढविणे आवश्यक आहे. मालमत्ता कर हे महानगरपालिकेचे महसूली उत्पन्नाचे महत्वाचे स्त्रोत आहे. मालमत्ता कराची बरीच वादग्रस्त व न्यायप्रविष्ट प्रकरणे आहेत. ही बाब लक्षात घेऊन अशी न्यायप्रविष्ट वादग्रस्त प्रकरणे मध्यस्थ विधी सेवा प्राधिकरण जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यांचेमार्फत तडजोडीने मिटवुन काढण्यासाठी अशी प्रकरणे त्यांचेकडे पाठविणेसाठी व यासाठी मनपा स्तरावर कमिटी स्थापन करून त्यांचेमार्फत प्रकरणे न्यायालयात निकाली काढणेसाठी कमिटीची स्थापना करणे व प्रकरण न्यायालयात मध्यस्थामार्फत तडजोडीने निकाली काढणेसाठी मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता आहे.

शहरातील मालमत्ता कराबाबतची अनेक प्रकरणे ही वादग्रस्त असून न्यायप्रविष्ट असल्यामुळे अशा मिळकतीचा मालमत्ता कर वसुली होण्यास विलंब होत असून थकबाकी मध्ये वाढ होत आहे. अशा न्यायप्रविष्ट प्रकरणाचा मेडीटेशन कोर्ट मार्फत त्वरीत निपटारा होण्यासाठी मा.न्यायालयातील विधीसेवा प्राधिकरण जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यांना विनंती करण्यांत येईल.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना न्यायालयात मध्यस्थामार्फत तडजोडीने प्रकरण निकाली काढण्यासाठी त्याकरीता कमिटीची स्थापना करण्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर.

| | |
|---|---|
| श्री.नितीन चित्ते | :एका व्यक्तीला अधिकार न देता कमेटी करावी त्या कमेटीने काम करावे. |
| श्री.विकास एडके | :यात स्थायी समितीचे स.सदस्यही असावे. |
| श्रीमती समीना शेख | :किती प्रकरणे वादग्रस्त आहे.सुनावणी किती प्रकरणात झाली अशी कमेटी स्थापन करण्याची वेळ का आली. |
| मा.सभापती | :नोटीस दिल्या काही कर धारकांना मान्य नाही म्हणून कोर्ट प्रकरण होते ते व्यापारी व नागरीक तडजोड करून मार्ग निघावा म्हणून ही कमेटी करायची या कमेटीत तीन अधिकारी असावे. |
| श्री.गजानन बारवाल | : कलम 481 काय आहे यात स्थायी समिती चे सर्व अधिकार आहे समितीचे दोन किंवा चार सदस्य नेमून त्याच बरोबर संबधीत अधिकारी बरोबर असतील सर्व एकत्र येऊन ही प्रकरणे निकाली काढण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. |
| विधी सल्लागार | :कर आकारणी बरोबर होत नाही म्हणून अक्षेप असतो म्हणून अनेक प्रकरणे मा.कोर्टात जातात मा.कोर्टा मार्फत वसुलीस प्रतिबंध होतो वेळ जातो व वसुली मिळत नाही अशा प्रकरणात तडजोडीने निकाली निघावी यासाठी यापुर्वी मा.सभापती व पदाधिकारी यांनी सुचना केल्या त्यानुसार हे प्रस्तावित केले स्थायी समितीच्या मंजूरीने शिवाय अशा प्रकरणात तडजोड करता येत नाही म्हणून मंजूरीसाठी आले आहे. |
| मा.सभापती | :कमेटीत कोणते अधिकारी असावे. |

विधी सल्लागार :नियमात तशी तरतूद नाही.ज्यांना टॅक्स ॲसीसमेन्ट आकारणी संबधी अनुभव आहे जे प्रकरण निकाली काढू शकतात अशाची नियुक्ती करावी.

मुख्य लेखा परीक्षक :कर निर्धारक व संकलक विधी सल्लागार व इतर अधिकारी यांची समिती असावी. कर निर्धारक अधिकारी यांनी कर आकारणी केली आहे. त्याच चॉलेंज केले आहे म्हणून वादग्रस्त प्रकरण झाले.या समितीचे अध्यक्ष म्हणुन मा.आयुक्त असतील.तडजोड झाल्यानंतर पुन्हा स्थायी समिती पुन्हा येणार आहे.

श्री.गजानन बारवाल :अध्यक्ष स्थायी समितीचे सभापती असू शकतात.

मा.सभापती : यात सूचना आल्यानुसार विधी सल्लागार, कर निर्धारक व संकलक अति.आयुक्त यांची समिती गठीत करण्यात येते तडजोड करून निर्णय करणे व स्थायी समितीसमोर पाठविणे असे आदेश देण्यात येते.विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मालमत्ता कर हे महानगरपालिकेचे महसूली उत्पन्नाचे महत्वाचे स्त्रोत असल्यामुळे व मालमत्ता कराची बरीच वादग्रस्त व न्यायप्रविष्ट प्रकरणे असल्याने, अशी न्यायप्रविष्ट वादग्रस्त प्रकरणे मध्यस्थ विधी सेवा प्राधिकरण जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यांचेमार्फत तडजोडीने मिटवुन काढण्यासाठी व अशी प्रकरणे त्यांचेकडे पाठविणेसाठी व यासाठी मनपा स्तरावर कमिटी स्थापन करून त्यांचेमार्फत प्रकरणे न्यायालयात निकाली काढणेसाठी कमिटीची स्थापना करणे व प्रकरण न्यायालयात मध्यस्थामार्फत तडजोडीने निकाली काढणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 481 अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना न्यायालयात मध्यस्थामार्फत तडजोडीने प्रकरण निकाली काढण्यासाठी त्याकरीता कमिटीची स्थापना करण्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विधी सल्लागार, कर निर्धारक व संकलक अति.आयुक्त यांची समिती गठीत करण्यात येते, तडजोड करून निर्णय करणे व स्थायी समितीसमोर पाठविणे, यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 18 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (BARTI) यांचे संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र हे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण उपक्रम राबविणे करीता देण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.704 दिनांक 20/01/2015 अन्वये रू.1/- नाममात्र दरवर्षी याप्रमाणे भाडे तत्वावर देण्यासाठी ठराव पारीत करण्यात आला आहे. तथापी संशोधन केंद्राचे बाजुस असलेली महानगरपालिकेची अण्णाभाऊ साठे वस्तीगृह हे समाजकल्याण विभागास 01,01,720/- प्रतिमाह या दराने भाडेतत्वावर देण्यात आले होते. सदरील इमारत ही जुनी असून समाजकल्याण विभागाने 26/06/2015 रोजी खाली केले आहे. ही इमारत देखील भाडेतत्वावर देणेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) यांनी मागीतली आहे. शिघ्र सिध्द गणक 2015 चे दरानुसार इमारतीचे व तेथील जागेचे मासीक भाडे 3,06,501/- रू. प्रतिमाह इतके येत आहे. तथापी सदर इमारत ही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, विविध स्पर्धा परीक्षा, परीक्षा मार्गदर्शन यासाठी सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमासाठी आवश्यक असल्याने समाजकल्याण विभागास ज्या भाड्याने देण्यात आली होती, त्याच भाडे रक्कमेने म्हणजेच 1,01,720/- रू. प्रतिमाह दराने भाडेतत्वावर मागीतली आहे. सदर इमारतीची अवस्था पाहता इमारत ही अत्यंत जुनी झाली असून इमारतीची परिस्थिती वाईट झालेली आहे. या इमारतीचे दुरूस्तीसाठी शहर अभियंता महानगरपालिका यांचेमार्फत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची अंदाजपत्रकीय किंमत 1.52 कोटी रूपये हा खर्च स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) स्वत: करणार आहेत व भविष्यात देखील सदर इमारतीची देखभाल दुरूस्तीही सदरील

संस्था स्वत:च करणार असून विद्युत बिलाचा भरणा करणे व इमारत सुस्थितीत राखणे ही जबाबदारी देखील त्यांचीच राहणार आहे. करीता पहिले वर्ष वगळून दुसऱ्या वर्षापासून 10 टक्के भाडेवाढ लागु राहील व विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना महानगरपालिकेसाठी 20 टक्के आरक्षण राहील, या अटीवर रू.1,01,720/- प्रतिमाह दराने इमारत तीन वर्षे भाडेतत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यता झाल्यास भाडेपट्टा करारनामा करण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर सादर.

मालमत्ता अधिकारी :ही संस्था युपीएससी एमपीएससीचे सर्व धर्मीयाच्या विदयार्थ्यांना ट्रेनिंग सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक 704 नुसार मंजूरी दिली.मानमात्र भाडेने देण्याचा ठराव पारीत केला (ठराव वाचून दाखवतात)समाज कल्याण विभागाला जी इमारत भाडेतत्वावर दिली ती इमारत बार्टीला देत आहोत.

श्रीमती समीना शेख :मनपासाठी 20 टक्के ऐवजी 30 टक्क् आरक्षण करावे.

मा.सभापती :मनपास भाडे देणार आहे जास्त बंधने घालणे योग्य नाही.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :इमारतीचे कन्ट्रक्शन खर्च कोण देणार व ज्यावेळी इमारत रिकामी करून देणार त्यावेळी इमारतीची स्थिती आहे तशी असणार का ?

मा.सभापती :एजन्सीच खर्च करणार मनपास भाडे येणार आहे.चांगल्या कन्डीशन मध्ये रिकामी करून घ्यावे.

श्री.इरशाद खान :भाडे रू.2 लक्षने कमी केले यामूळे किमान महानगरपालिकेच्या शिफारस केलेल्या विदयार्थ्यासाठी मोफत प्रशिक्षण दयावे.

मालमत्ता अधिकारी :यापेक्षा भाडे जास्त या इमारतीचे येणार नाही एजन्सी दुरूस्तीसाठी 1.50 कोटी देणार सुरूवातीला खर्च करणार आहे.ही संस्था महाराष्ट्र शासन संचलित असून समाज कल्याण सुध्दा शासकीय कार्यालय आहे त्यांना जे रेट होते तेच ठेवले आहे.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :सर्व जाती धर्माच्या विदयार्थ्यांना प्रवेश असेल त्या त्या जातीच्या संवर्गातील विदयार्थ्यांना प्रवेश मिळाला की नाही हे मनपाने दरवर्षी तपासणी केली पाहिजे करारनाम्यात असावे

मा.सभापती :ही संस्था मनपाची नाही स्वतंत्र शासन संचलित आहे.ही इमारत भाडेने देण्याचा करार करतो आहे

श्री.विकास एडके :20 टक्के मनपाचे आरक्षण म्हणजे काय

मा.सभापती :महापालिकेने शिफारस केलेल्या विदयार्थ्यांना प्रवेश यात प्रकल्प विभागा मार्फत सजेशन देऊ शकतो किंवा सर्वसाधारण सभेत चर्चा करून एका सदस्यांनी किती लोकांना शिफारस दयायची ते निश्चित करावे लागेल.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :करारनाम्याची प्रत सर्व सदस्यांना दयावी हा प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती :याची प्रत सर्व सदस्यांना दयावी हा विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (BARTI) यांचे संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र हे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण उपक्रम राबविणे करीता तसेच संशोधन केंद्राचे बाजुस असलेली महानगरपालिकेची अण्णाभाऊ साठे वस्तीगृह ही इमारत देखील भाडेतत्वावर देणेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) यांनी मागणी केल्यानुसार आणि इमारतीचे दुरूस्तीसाठी शहर अभियंता महानगरपालिका यांचेमार्फत तयार केलेले र.रू.1.52 कोटी रूपये असलेला खर्च स्वत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) यांनी स्वत: करणे व भविष्यात देखील सदर

इमारतीची देखभाल दुरूस्तीही सदरील संस्थेने करणे तसेच विद्युत बिलाचा भरणा करणे व इमारत सुस्थितीत राखणे ही जबाबदारी संस्थेची राहील आणि पहिले वर्ष वगळून दुसऱ्या वर्षापासून 10 टक्के भाडेवाढ लागू राहील व विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना महानगरपालिकेसाठी 20 टक्के आरक्षण राहील, या अटीवर रू.1,01,720/- प्रतिमाह दराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (BARTI) यांना सदर इमारत तीन वर्षे भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 19 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक व जागतिक पर्यटन स्थळ असून अतिशय संवेदनशिल आहे. शहराची झपाट्याने सुरू असलेली वाढ व त्या प्रमाणात वाढलेली गुन्हेगारी, वाहतुक समस्या, देशाला भेडसावणारा दहशतवाद या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून "सेफ सिटी प्रकल्प" राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत औरंगाबाद शहराची देखील निवड करण्यात आलेली आहे. या प्रकल्पा अंतर्गत C.C.T.V. कॅमेरे बसविण्याकरीता जिल्हा वार्षिक योजना (DPDC) सन 2014-15 अंतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये याकामासाठी रू.2 कोटीचा निधी प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकल्प राबविण्यासाठी दि.21/02/2015 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.757 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

या कामाचा DPR तयार करण्यासाठी दि.25/02/2015 अन्वये निविदा मागवुन मे.महा इन्फोटेक प्रा.लि. मुंबई यांना PMC म्हणुन (प्रकल्प सल्लागार) दि.17/03/2015 रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर DPR च्या मान्यतेनुसार दि.09/06/2015 रोजी "सेफ सिटी प्रकल्प" प्रकल्पासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा दाखल करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी सात निविदा प्राप्त झाल्या उपरोक्त उघडलेल्या तांत्रिक कागदपत्राची तपासणी प्रकल्प सल्लागार मे.महा इन्फोटेक प्रा.लि. यांच्यातर्फे करण्यात आली असता, केवळ दोन निविदाधारक पात्र ठरले.

01. मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड, मुंबई.
02. मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि.,मुंबई.

वरील दोन्ही पात्र कंपन्यांना दि.13/08/2015 व दिनांक 14/08/2015 रोजी सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचे प्रात्यक्षिक व सादरीकरण करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.13/08/2015 रोजी अमरप्रीत चौकात दोन्ही कंपन्यांच्या वतीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आले होते व मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी येथे त्याचे कंट्रोलरूम ठेवण्यात आले होते.

दि.14/08/2015 रोजी प्राप्त निविदाच्या तांत्रिक मुल्याकंन करणेस नेमलेली समिती ज्यात

01. मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद
02. मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद
03. एमआयपीएल कंपनीतर्फे त्यांचे दोन प्रतिनिधी

यांच्या उपस्थितीमध्ये मराठवाडा महसूल प्रबोधिनी येथे प्रात्यक्षिक व सादरीकरण देण्यात आले व उपरोक्त प्रात्यक्षिक व सादरीकरण केलेल्या कंपन्यास TEC (Technical Evaluation Committee) ने त्या त्या योग्यतेनुसार (निविदा अटी नुसार) मार्क देण्यात आले. त्यानंतर मा.आयुक्त, महानगरपालिका यांचे दालनात दोन्ही कंपन्यांचे Financial Bid उघडण्यांत आले. सदर Financial Bid चे दर व प्रात्यक्षिक तसेच सादरीकरणाचे प्राप्त मार्क यांचा तुलनात्मकदृष्टीने विचार केल्यानंतर मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमीटेड, मुंबई ही कंपनी पात्र ठरली. मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमीटेड, मुंबई यांनी दिलेले दर हे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| मे हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड, मुंबई | -- | रू.2,19,40,706/- |
| चौथ्या व पाचव्या वर्षी देखभाल दुरूस्तीसाठी लागणारा निधी | -- | रू. 16,00,000/- |
| | **एकूण** | **रू.2,35,40,706/-** |

असे एकूण रू.2,35,40,706/- दर दिलेले आहे. तरी या बाबतीत मा.तांत्रिक समितीने सदर कंपनी सोबत दराची वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दरास मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण कामासाठी लागणारा खर्च | -- | रू.2,00,00,000/- |
| चौथ्या व पाचव्या वर्षी देखभाल दुरूस्तीसाठी लागणारा निधी | -- | रू. 16,00,000/- |
| | **एकूण** | **रू.2,16,00,000/-** |

चौथ्या व पाचव्या वर्षासाठी देखभाल दुरूस्तीचे कामास लागणारा निधी त्या संबंधीत वर्षात लेखा तरतुद उपलब्ध झाल्यानंतर देण्यांत येईल, असेही वाटाघाटीत ठरले.

तरी मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड, मुंबई यांची रक्कम रू.2,16,00,000/- (रू.दोन कोटी सोळा लक्ष) ची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.विकास एडके :एका प्रस्तावानुसार दोन निविदा येतात एक फायनल झाले त्याच प्रमाणे या प्रस्तावात आले 23-9-2013 रोजी शासनाच्या नियमानुसार कमीत कमी तीन टेंडर यावे असे म्हटले नसेल तर 7 दिवसाची मुदत दयायला पाहिजे तसे यात केले का ?

श्रीमती समीना शेख :दुस-या निविदा आल्या असतील त्या बात का झाल्या तांत्रिक त्रृटी काय होत्या ते सुध्दा प्रस्तावात यायला पाहिजे.

श्री.बारवाल गजानन :यासाठी कमेटी नेमली मान्यता दिली माहितीस्तव हा विषय आहे मंजूर करावे.

कार्य.अभियंता(श्री.कोल्हे) :डीपीडीसीच्या माध्यमातून सन 2014-15 मध्ये दोन कोटी मंजूर केले सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली मे. महा इन्फोटेक प्रा.लि.ही प्रकल्प सल्लागार पीएमसी नेमली डीपीआर बनवून राबविण्याचे ठरविले.दि.9-6-2009 रोजी निविदा मागविल्या सात आल्या निविदा धारकाची टेक्नीकल तपासणी केली या दोन निविदा धारका शिल्लक राहिल्या दोन्ही निविदा धारकाकडून प्रॅक्टीकल करून घेतले मा.पोलीस आयुक्त व मा.आयुक्त व मा. जिल्हाधिकारी व सल्लागार समितीचे दोन प्रतिनिधी यांनी तपासणी केली व मे हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमीटेड मुंबई याची निविदा उघडावी असे ठरले या एजन्सीबरोबर वाटाघाटी करून हे रेट दिले.

श्री.विकास एडके :तीन पेक्षा कमी निविदा असू नये असे शासनाचे निर्देश आहे. दोन निविदा असतांना फायनल कसे केले.

कार्य.अभियंता -अव ड :समिती समोर हे ठेवले होते समितीने हे मान्य केले.

मा.सभापती :समितीने हा विषय लक्ष देऊन मान्य केला शहराच्या सुरक्षेच्या संदर्भात आहे. महापालिका ही एजन्सी आहे.डीपीडीसीने निधी दिला टेक्नीकल सपोट पाहिजे म्हणून कार्यवाही करायची त्यानुसार ही निविदा केली सर्व देखरेख मा.पोलीस आयुक्त व मा.जिल्हाधिकारी हे ठेवणार आहे.

श्री.विकास एडके :माझ्या माहिती प्रमाणे काम कुणाले दयायचे अधिकारी ठरवितात का?

श्री.अब्दुल र. नाईकवाडी :7 टेडंर आले यात नमूद केले नाही ठेकेदार रिंग करतात.हे माहित आहे.

श्री.विकास एडके :कमेटी डीपीडीसी चे नुसार त्याच कामासाठी खर्च होतात हे बघणार आहे टेक्नीकल काम मनपाचे अधिकारी पाहणार आहेत.

मा.सभापती :ज्या निविदा तांत्रिक बाबीमध्ये बसत नसल्यास कारणे काय त्याचा उल्लेख निविदेमध्ये यापुढे करावा.

कार्य.अभियंता-अ व ड :तांत्रिक मुल्यांकन समिती त्यात मा.पोलीस आयुक्त मा.आयुक्त मनपा व मा. जिल्हाधिकारी आहे व महा इल्फोटेकचे तांत्रिक 02 सदस्य माहिती देण्यासाठी होते कागदपत्राची छाननी या समितीने केली दोन निविदा राहिल्या त्यांचे प्रॅक्टीकल घेतले.

श्री.नितीन चित्ते :सदस्यांनी आरोप केले त्याची चौकशी करावी. प्रस्ताव मान्य करावा.

मा.सभापती :विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर "सेफ सिटी प्रकल्प" या प्रकल्पा अंतर्गत शहरात C.C.T.V. कॅमेरे बसविण्याकरीता प्राप्त झालेल्या निविदापैंकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमीटेड, मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड, मुंबई यांची रक्कम रू.2,16,00,000/- (रू.दोन कोटी सोळा लक्ष) च्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 20 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान या महत्वाकांक्षी अभियानाची घोषणा मा.पंतप्रधान महोदयानी दि.25.6.2015 रोजी केली आहे. केंद्रशासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियान हे खालील प्रमाणे दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे.

**अ. प्रथम टप्पा:-**

केंद्र शासनामार्फत प्राप्त मार्गदर्शक सूचनानुसार स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाकडून कळविण्यात आलेल्या राज्यातील 10 लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या अभियान शहरातून स्पर्धात्मक पध्दतीने 10 शहराची निवड करुन सदर शहराची शिफारस केंद्र शासनाकडे करणे.

**ब. दुसरा टप्पा:-**

सदर अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात राज्य शासनामार्फत निवड करण्यात आलेल्या शहरांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करुन तो केंद्र शासनामार्फत घेण्यात येणाऱ्या आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेजमध्ये सादर करणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरावर निवड केलेल्या 10 शहरामध्ये औरंगाबाद शहराची निवड केलेली आहे. या पहिल्या टप्प्यात औरंगाबाद शहराची झालेली निवड व केलेली शिफारसीनंतर केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर जाहीर केलेल्या 100 शहरामध्येही औरंगाबाद शहराचा समावेश केलेला आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार केंद्र शासनाच्या सदर निकषाची जास्तीत जास्त पूर्तता करण्यामध्ये सक्षम ठरणारे व केंद्रीयस्तरावरील आंतरराज्यीय स्पर्धेमध्ये पात्र होण्यास सक्षम होणारे प्रस्ताव सादर करणारी शहरे आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेजमध्ये सहभागी होवू शकतील.

उपरोक्त स्मार्ट सिटी योजनेकरीता शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शहरांतर्गत शहराची विद्यमान स्थिती व उपलब्ध स्त्रोत,कमतरता मुलभूत व पायाभूत सोयीसुविधा,शहराची बलस्थाने इत्यादीचा विचार करुन विविध प्रकल्पाबाबत स्मार्ट सिटी चॅलेजसचा प्रस्ताव/प्रकल्प अहवाल तयार करणे (DPR),प्रस्ताव/प्रकल्प अहवाल शासनाकडे सादर करणे तसेच प्रस्ताव/प्रकल्प अहवालामधील काही त्रुटी असल्यास त्या त्रुटीची पूर्तता करणे इत्यादी तांत्रिक बाबीबाबत तातडीने अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project management Consultant) यांची नेमणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.60 दि.20.7.2015 अन्वये औरंगाबाद शहराकरीता स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याच्या कार्यवाहीसाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार केंद्र शासनाने स्मार्ट सिटी प्रकल्पाकरीता प्रकल्पासंदर्भाने सविस्तर प्रस्ताव तयार करण्याकरीता महाराष्ट्र व झारखंड राज्याकरीता 11 मान्यता प्राप्त संस्थाची / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project management Consultant) नियुक्त केले आहे. त्या नियुक्त 11 प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामधून औरंगाबाद शहराकरीता स्मार्ट सिटी चॅलेजसचा प्रस्ताव तयार करण्याबाबत स्पर्धात्मक पध्दतीने एकाची निवड करण्याच्या सूचना मा.सचिव,नगर विकास विभाग,महाराष्ट्र राज्य यांनी बैठकी दरम्यान दिल्या.त्यानुसार केंद्र शासनाचे निकष आहे त्या निकषाप्रमाणे केंद्रशासन मान्यता प्राप्त 11 प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना ई मेल द्वारे संदेश पाठवून कळविण्यात आले. त्याबाबत हिंदुस्तान टाईम्स या इंग्रजी वर्तमान पत्रातून निविदा क्र.221/2015 दि. 20.8.2015 रोजी तसेच ई-निविदाद्वारे ऑन लाईन Preparation of proposal for assisting Aurangabad participate in smart cities challenges (proposal of smart city) साठी निविदा मागविण्यात आल्या. या निविदेच्या स्विकृत कालावधीमध्ये एकूण 4 निविदा विक्री झाल्या व निविदेच्या अंतिम स्विकृत तारखेपर्यन्त एकूण 3 निविदा दरप्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समितीचे नाव |
|---|---|
| 1. | Knight Frank (India) Pvt. Ltd. In Association with Fortress Infrastructure services and PSP Financial Consultants Pvt. Ltd. |
| 2. | CRISIL Risk and Infrastructure Solutions Ltd.in association with primove Infrastructure Develompment Consultant pvt.ltd And Probity Soft pvt.ltd. |
| 3. | Aarvee Associate Architects Engineers & Consultants Pvt. Ltd. In Association with MARS Telecom Sysstem Pvt. Ltd. |

वरील प्राप्त तीन निविदासोबत त्यांनी सादर केलेले तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) तपासुन केलेल्या पुर्तता संबंधाने दि. 31.08.2015 रोजी सकाळी 11.00 वाजता या तीनही संस्था / निविदाधारकांनी सादरीकरण (Presentation) केले. तांत्रिक कागदपत्रे व सादरीकरण (Presentation) आधारे या निविदाचे मुल्यांकन (Evaluation) करणे करीता गठीत करण्यात आलेल्या तांत्रिक मुल्यांकन समितीने (Technical Evaluation Commitee) गुणांकन केले. समितीने केलेल्या गुणांकणानुसार या तीन निविदाधारकांना त्यांचे गुण कळविण्यात आले व तद्नंतर दि. 01.09.2015 रोजी या तीनही संस्था / निविदाधारकांचे Financial Bid उघडण्यात आले. त्यानुसार समितीने तांत्रिक कागदपत्रे (Technical Documents) व Financial Bid यासाठीचे निविदेमधील अटी/शर्तीनुसार दिलेल्या एकत्रित गुणांकणानुसार खालीलप्रमाणे गुणसंख्या आहे.

| अ.क्र | प्रकल्प सल्लागार समितीचे नाव | प्राप्त गुण संख्या (100 पैकी) | निविदा रक्कम (Offer) (सर्व करासह) |
|---|---|---|---|
| 1. | Knight Frank (India) Pvt. Ltd. In Association with Fortress Infrastructure services and PSP Financial Consultants Pvt. Ltd. | 82.98 गुण | 1,13,01,960/- |
| 2. | CRISIL Risk and Infrastructure Solutions Ltd.in association with primove Infrastructure Develompment Consultant pvt.ltd And Probity Soft pvt.ltd. | 75.35 गुण | 1,48,20,000/ |
| 3. | Aarvee Associate Architects Engineers & Consultants Pvt. Ltd. In Association with MARS Telecom Sysstem Pvt. Ltd. | 66.70 गुण | 63,00,000/- |

यामध्ये **सर्वोच्च गुणसंख्या म्हणजेच 82.98 गुण** Knight Frank (India) Pvt. Ltd. In Association with Fortress Infrastructure services and PSP Financial Consultants Pvt. Ltd. यांना असुन त्यांची प्रस्तावित निविदा रक्कम **(Offer) रक्कम रु. 1,13,01,960/-** (सर्व करासह)एवढी आहे. तांत्रिक कागदपत्रे (Technical Documents) व Financial Bid यासाठीचे एकत्रित सर्वात जास्त गुणांची निविदा म्हणुन **Knight Frank (India) Pvt. Ltd.** In Association with Fortress Infrastructure services and PSP Financial Consultants Pvt. Ltd. या कंपनीची प्रस्तावित निविदा रक्कम **(Offer) रक्कम रु. 1,13,01,960/-** (सर्व करासह)मान्य करुन या संस्थेची औरंगाबाद शहराकरीता स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :या विषयावर प्रेझेंटेशन झाले एजन्सीला सुचना दिल्या.स्मार्ट सिटी मध्ये या शहराची निवड झाली मुलभूत सोयी सुविधा उदयान, जलतरण तलाव,उड्डाण पुल असेल मनपाचे मोठे प्रकल्प चालू आहे ओव्हरब्रीज तयार केला त्या विषयी काय नियोजन करणार आहे तसेच सिडको शहर प्लॅनींगने केले त्यात काय सुविधा देता येतील.अतिक्रमणाचा प्रश्न सुटावा मार्कीग करावे शिक्षण आरोग्य याकडे लक्ष दयावे.मनपाच्या जागा विकास करावा भाजी मटन फिश मार्केट टपरी मार्केट असावे. पीएमसीवर मनपाचे नियंत्रण असावे मंजूर करावे. |
| श्रीमती सलीमा शेख | :वाटाघाटी केल्या काय? |
| श्री.रावसाहेब आमले | :पीएमसीला 82.98 गुण कसे दिले. |
| श्री.अब्दुल र.नाईकवाडी | :ज्या सुचना केल्या त्यानुसार दुरूस्तीसह मंजूर करावे. |
| कार्य.अभियंता ई/फ | :यासाठी टेक्नीकल कमेटी आहे.मार्कस कसे दयायचे अनुभवावर 20 टक्के शहराची माहिती कशी आहे 25 मार्क .मॅथॉलॉजकल कसे यास 10 टक्के मार्क.प्रोफेशनलर ,इन्फ्राईज स्ट्रक्चर गव्हर्नर स्पेशालिस्ट यावर काही मार्क आहे.सर्व मिळून 100 मार्क आहे त्यापैकी 60 टक्के मार्क घेतलेली एजन्सी पात्र ठरते यात मा.आयुक्त शहर अभियंता मुख्य लेखा परीक्षक, मुख्यलेखाधिकारी , सहा.संचालक नगररचना,विधी सल्लागार |
| मा.सभापती | :दुरूस्तीसही मंजूर करावे.काय दुरूस्त्या करता येतील त्या कराव्यात. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व पर्यावरण पुरक शहरे तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान या महत्वाकांक्षी अभियानाची घोषणा मा.पंतप्रधान महोदयानी दि.25.6.2015 रोजी केल्यानुसार तसेच प्रस्तावित **अ** व **ब** प्रमाणे तसेच केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार केंद्र शासनाच्या सदर निकषाची जास्तीत जास्त पूर्तता करण्यामध्ये सक्षम ठरणारे व केंद्रीयस्तरावरील आंतरराज्यीय स्पर्धेमध्ये पात्र होण्यास सक्षम होणारे प्रस्ताव सादर करणारी शहरे आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेंजमध्ये सहभागी होणेकरीता स्मार्ट सिटी योजनेकरीता शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शहरांतर्गत शहराची विद्यमान स्थिती व उपलब्ध स्त्रोत, कमतरता मुलभूत व पायाभूत सोयीसुविधा, शहराची बलस्थाने इत्यादीचा विचार करून विविध प्रकल्पाबाबत स्मार्ट सिटी चॅलेंजसचा प्रस्ताव/प्रकल्प (proposal of smart city) अहवाल तयार करणे (DPR), प्रस्ताव/प्रकल्प (proposal of smart city) अहवाल शासनाकडे सादर करणे तसेच प्रस्ताव/प्रकल्प (proposal of smart city) अहवालामधील काही त्रुटी असल्यास त्या त्रुटीची पूर्तता करणे इत्यादी तांत्रिक बाबीबाबत तातडीने अहवाल तयार करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वोच्च गुणसंख्या म्हणजेच 82.98 गुण Knight Frank

(India) Pvt. Ltd. In Association with Fortress Infrastructure services and PSP Financial Consultants Pvt. Ltd. यांना असल्यामुळे त्यांची एकत्रित सर्वात जास्त गुणांची निविदा रक्कम (Offer) रक्कम रु. 1,13,01,960/- (सर्व करासह) मान्य करून या संस्थेची औरंगाबाद शहराकरीता स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन नियुक्ती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.मकरंद कुलकर्णी | :शहरात 60 टक्के लाईट बंद आहे, एजन्सीला बील दिले जात नाही तरी सुध्दा त्याच एजन्सीला टेंडर का दिले जाते. |
| श्री.अब्दुल र. नाईकवाडी | :स्मार्ट सिटीकडे जात आहोत लाईट नाही. टेंडर काढले जाते वर्क ऑर्डर देतो असे सांगण्यात येते.एजन्सीने मुदतीत काम केले नाही तर बील देणार का ? |
| श्रीमती ज्योती पिंजरकर | :माझ्या वार्डात 5 महिण्यापासून लाईट बंद आहे. |
| श्री.रावसाहेब आमले | :मुदत वाढवून दिली होती वेळेत लाईटचे काम केले नाही तर बीलही देऊ नये. |
| श्री.गजानन बारवाल | :वस्तुस्थिती आहे लाईट बंद आहे.जे टेंडर आले त्याची परीस्थिती काय आहे. |
| श्री.ज्योती मोरे | :माझ्या वार्डात लाईट बसवले जात नाही व देखभाल दुरूस्तीही होत नाही. |
| मा.सभापती | :3-4 महिण्यापासून लाईटचे काम होत नाही.एजन्सीला मुदतवाढ दिली त्या मुदतीत कामे केले नाही तर बील देऊनये असे आदेशीत केले होते असे असतांना काम केलेले नाही.आजची परीस्थिती काय आहे. |
| कार्य.अभियंता-अ व ड | :कामे करण्याची मुदत दिली होती काही ठिकाणी कामे केली आहे. कंपनीने कामे केली नाही तर बील देणार नाही. टेंडर काढले होते पुन्हा काढावे लागले आता निविदा मान्यतेसाठी मा.आयुक्ताकडे आहे.पुढील कार्यवाही तात्काळ होईल. |
| श्री.मकरंद कुलकर्णी | :या ठेकेदारास 3-4 महिण्याचे पेमेन्ट देऊ नये. |
| मा.सभापती | :काही भागात कामे केली असेल जेथे काम केले नाही त्याचे पेमेंन्ट देऊ नये. |
| श्री.नितीन चित्ते | :वार्डात लाईटचे काम केल्या बाबत स.सदस्यांची एनओसी घेतल्या शिवाय पेमेंन्ट देऊ नये. |
| मा.सभापती | :ज्या भागात कामे केली त्या भागाचे स.सदस्यांची एनओसी घेऊन संबधीतास बिल अदा करावे. |
| श्रीमती समीना शेख | :उपअभियंता श्री.बनकर यांनी सन 2014-15 या काळात त्यांनी केलेल्या कामाची चौकशी केली आहे का अहवाल मागितला होता. |
| उपआयुक्त(प्र) | :ॲक्शन पॉईन्टमध्ये हा मुद्दा होता या संदर्भात कार्य.अभियंता अ व ड आस्थापना विभागाकडे विचारणा केली असता कोणतीही चौकशी अहवाल या विभागाकडे प्राप्त नसल्याचे म्हटले आहे. |
| मा.सभापती | :स.सदस्यांना लेखी खुलासा देण्यात यावा. |
| श्रीमती समीना शेख | :सन 2014-15 या वर्षात या अधिकारी यांनी मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. |
| मा.सभापती | :आठ दिवसात याची माहिती घेवून कार्यवाही करावी. |
| श्री.विकास एडके | :5 महिण्यापासून विकास कामे होत नाही. |
| मा.सभापती | :बजेटची सभा होईल त्यानंतर कामे होतील. |
| श्री.नितीन चित्ते | :श्री.देविदास वाहुळे हे मनपाच्या शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते एका प्रकरणा गुन्हा दाखल झाला त्यानुसार मा.आयुक्तांनी त्यांना निलंबीत केले होते कोर्ट प्रकरण झाले त्यांचे बाजुने मा.कोर्टाचा निकाल लागला.ते दोषी नाही असे असतांना त्यांना कामावर घेतले जात नाही. तात्काळ समावून घ्यावे. |

| | |
|---|---|
| उपआयुक्त(शिक्षण ) | :मा.कोर्टात समोर ते निर्दोष असल्याचा रिपोर्ट गेलेला आहे. पदस्थापनेचे आदेश दिले, पोस्टींग देणे बाकी आहे. |
| श्रीमती रेश्मा कुरैशी | :3 महिण्यापासून पाणी पुरवठा सुरळीत करण्या विषयी पत्र देत आहे कार्यवाही होत नाही. |
| कार्य.अभियंता -पापू | :या भागात एकाच लाईनवर दोन क्रॉस कनेक्शन व.एकाच दिशेने लाईन जाते जुने कनेक्शन जुन्या लाईनवर आहे ती बंद करू देत नाही त्यामूळे सर्वांना पाणी मिळत नाही.पाहणी केली एक लाईन बंद करण्याचे आदेश केले आहे. |
| मा.सभापती | :एकच लाईन ठेवावी नवीन कनेक्शन तेथील नागरीकांनी पैसे भरून घ्यावे. |
| श्री.कमलाकर जगताप | :मुकूंदवाडी येथील मनपाच्या शाळेसाठी सायन्स लॅबची संचिका मंजूर आहे पुढे कार्यवाही होत नाही. |
| मुख्यलेखाधिकारी | :या बाबतची संचिका तपासून घेवून पुढील कार्यवाही केली जाईल. |
| श्री.गजानन बारवाल | :कलम 105 अन्वये लेखाची साप्तहीक छाननी,लेखापरीक्षण करणे आवश्यक असते लेखा विभागाकडून लेखा परीक्षकणासाठी साप्ताहिक जमा खर्चाची माहिती सादर केली जात नाही. त्यामूळे मुख्य लेखा परीक्षक मार्फत साप्ताहिक अहवाल स्थायी समितीकडे सादर होत नाही. त्याबाबत तसे आदेशीत करावे.सदर विभाग हा मा.सभापती स्थायी समिती यांचे अधिपत्याखाली व नियंत्रणाखाली सदर विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या बदल्या करणेपूर्वी मा.सभापती यांची संमती घेणे आवश्यक परंतु अशा बदल्या करतांना प्रशासनाने मा.सभापतीची संमती घेतली नाही लेखा परीक्षण विभागात किती कर्मचारी व अधिकारी आवश्यक आहे. उपमुख्य लेखा परीक्षक हे पद भरण्यात आले काय? पद भरले असेल तर त्या पदावर कोणते अधिकारी काम करतात लेखा परीक्षण काम करतात का किंवा इतर विभागात बदली केली तसे असेल तर मा.सभापती यांची सम्मती घेतली काय? या विभागात कर्मचारी अधिकारी वर्ग कमी असतांना अशा बदल्या करणे कितपत योग्य ऑडिट वेळेत होत नसेल तर जबाबदार कोण असा प्रश्न येतो. शासन निर्णय क्र. संकिर्ण 1005 वर्गीकरण प्रक्र 359 /05 नवि-24 दि. 4 मे 2006 नुसार लेखा विभागाच्या अशा लेखा सेवेतील अधिकाऱ्यांची प्रशासकिय सेवेतील पदांवर बदलीने प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येत नाही हे सत्य काय असल्यास उपमुख्य लेखा परिक्षक यांची बदली कशी झाली लेखा परीक्षण विभागाचे कामातच मूळात शासनाच्या नियमाचे निर्णयाचे उल्लंघन होत असल्यास ते शोधून काढावे व त्यावर कारवाई होणेच्या दृष्टिकोणातून मा.स्थायी समितीसमोर असा अहवाल वेळोवेळी ठेवावा असे अभिप्रेत असतांना दिनांक 4-5-06 च्या निर्णयाची लेखा परीक्षण विभागाने दखल घेतली नाही उपमूख्य लेखा परीक्षक यांची लेखा परीक्षण विभागास गरज नाही का, प्रत्येक आठवडयाचा अहवाल का मिळत नाही सर्व खुलासा करावा. |
| मुख्यलेपरीक्षक | :कलम 105 नुसार साप्ताहिक जमा खर्चाचा अहवाल स्थायी समिती सभेपूढे सादर करणे आवश्यक आहे.लेखा विभागाकडून माहिती प्राप्त होत नाही वारवांर पत्रव्यवहार केला त्याची प्रत मा.सभापती स्थायी समिती व मा.आयुक्तांना दिली आहे. |
| श्री.गजानन बारवाल | : गंभीर बाब आहे, मा.महापौर व मा.सभापती यांना याची माहिती वेळीच पुरविणे आवश्यक आहे. पत्रव्यवहार होऊन सुध्दा माहिती लेखा विभाग का देत नाही. |

| | |
|---|---|
| मुख्यलेखाधिकारी | : साप्ताहिक अहवाल लेखा परीक्षण विभागाकडे देणेसाठी लेखा विभागात कर्मचारी संख्या कमी असल्यामूळे एक वर्षापासूनचा अहवाल देऊ शकलो नाही आठ दिवसात लेखा परीक्षक विभागाकडे अहवाल पाठविण्यात येईल. |
| श्री.गजानन बारवाल | :कर्मचारी नाही, यापूर्वी मा.सभापती यांना कळविले का नाही. |
| मा.सभापती | :प्रत्येक आठवडयाचा अहवाल येणे आवश्यक आहे.एक वर्षापासून अहवाल आला नाही या बाबतीत मा.आयुक्तांनी लक्ष घालून तसेच बदल्या करतांना काही गोष्टीचा विचार केला नाही ही दखल घ्यावी आवश्यक कर्मचारी लेखा विभागात देऊन मागिल लेखा अहवाल व व येथून पूढील लेखा अहवाल लेखा विभागाने लेखा परीक्षक यांचेकडे नियमीत पाठवावा तक्रारी व अनियमितता होणार नाही याची दखल घ्यावी झाल्यास त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. |
| श्री.गजानन बारवाल | :उपमुख्यलेखा परीक्षक यांची कुठे बदली केली, मा.सभापती यांना तसे कळविले होते का? |
| आस्थापना अधिकारी-1 | :उपमुख्यलेखा परीक्षक हे पद मंजूर असून त्या पदावर श्री.एमएम पाटली यांची नियुक्ती केली त्यांना सध्या पदनिर्देशित अधिकारी म्हणून अतिक्रमण विभागात दिले लेखा परीक्षक विभागातील कर्मचा-यांच्या सध्यस्थितीत बदल्या केल्या नाही. |
| श्री.नितीन चित्ते | :जनरल बदली म्हणजे काय ? |
| आस्थापना अधिकारी-1 | :यात अनेक विभागातील कर्मचारी यांचे बदल्या जे की कामकाजात सुलभता येईल जेथे कर्मचारी कमी असेल त्यानुसार प्रशासकीय दृष्टीकोनातून बदल्या करीत असतो. |
| श्री.नितीन चित्ते | :2005 मध्ये जनरल बदल्या केल्या त्यानंतर मागिल वर्षी चिठ्ठया काढून बदल्या केल्या चार महिणेनंतर आहे त्या ठिक्राणी त्यांना दिले टी पी विभागाचे कर्मचारी त्याच विभागात वर्षानुवर्ष आहेत त्यांना हे नियम लागू नाही का ? |
| अति.आयुक्त | :उपमुख्य लेखा परीक्षक यांची लेखा परीक्षण विभागास गरज आहे. तेवढेच अतिक्रमणाचे काम महत्वाचे होते त्यांची गरज आहे विभाग प्रमुखांनी निदर्शनास आणून देणे आवश्यक होते या बाबत चर्चा करून योग्य निर्णय घेऊ. |
| श्री.गजानन बारवाल | : .शासन निर्णय क्र. संकिर्ण 1005 वर्गीकरण प्रक्र 359 /05 नवि-24 दि. 4 मे 2006 नुसार लेखा विभागाच्या अशा लेखा सेवेतील अधिका-यांची प्रशासकिय सेवेतील पदांवर बदलीने प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येत नाही असे असतांना बदली का केली.ते अधिकार प्रशासनाला आहे का ? |
| मा.सभापती | :अति.आयुक्त यांनी या विषयी योग्य निर्णय घ्यावा. |
| अति.आयुक्त | :जनरल बदली तीन वर्षानंतर करता येते शासन निर्णय आहे. अशा बदल्या झाल्याच पाहिजे. बदली विषयक महापालिकेने उपविधी तयार करायला पाहिजे. |
| श्री.नितीन चित्ते | :काही कर्मचारी एकाच विभागात अनेक वर्षापासून काम करतात काहींना प्रभारी चार्ज दिले समांतर एजन्सीकडे रेग्यूलर उपअभियंता जे ई दिले.जेथे शाखा अभियंताचे पद तेथे वार्ड मध्ये प्रभारी अभियंता म्हणून दिले.बारकाईने अभ्यास करावा.समांतर एजन्सीकडे रेग्यूलर उपअभियंता देण्याची गरज नाही.नगरसचिव यांचेकडे तीन चार्ज आहे त्यामुळे इतिवृत्त मिळत नाही.प्रकल्प अधिकारी शासनाचे नको पत्र पाठविले. नगरसचिव यांचेकडे असलेले दुसरे दोन चार्ज काढून घ्यावे. |
| मा.सभापती | :सदस्यांची मागणी लक्षात घेता या बाबत अमलबंजावणी करावी. |

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :मोकाट कुत्रेचा बदोबस्त टेक्नीकली काय करता येईल. |
| मुख्य पशसंवर्धन अधि. | :टेंडर प्रोसेस केली 5 तारखेला टेंडर ओपन करणार आहोत त्यानंतर दोन गाडया चालू होतील.मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार कुत्रे मारता येत नाही कुत्रे पकडण्यासाठी 20 कर्मचारी आवश्यक आहे तीन वेळा पत्र दिले.गाडयाची मागणी यांत्रिक विभागाकडे केली आले नाही. |
| मा.सभापती | :आवश्यक तो कर्मचारी देण्यात यावा.यात्रिकी विभागाने गाडया देण्याची कार्यवाही करावी |
| श्री.अब्दुल र. नाईकवाडी | :कुत्रे मारू शकत नाही तर पकडून काय करणार. |
| मा.सभापती | :त्यांना लस देणे,ऑपरेशन करणे परत सोडून देणे अशी कार्यवाही आहे. |
| श्री.अब्दुल र. नाईकवाडी | :नसबंदी करतात तरी संख्या का वाढली. |
| श्रीमती कमल नरोटे | :माझ्या वार्डातील ए-1 हॉटेल ते मारोतीमंदीरचा व्हाईट टॅपिग रस्ता मंजूर झाला वर्क ऑर्डर देऊन 10 महिणे झाले काम सुरू झाले नाही. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करावी. |
| श्रीमती समीना शेख | :श्री.बनकर उपअभियंता यांचे बाबतीत चौकशी समिती नेमली नाही असे म्हटले मला चुकीचे माहिती दिली.चौकशी अहवाल येइपर्यत त्यांचे पेन्शन थांबवावे. |
| उपआयुक्त (प्र) | :या बाबत काही चौकशी चालू आहे का चौकशी झाली का संबधीत आस्थापना विभाग व कार्य.अभियंता अ ड यांना विचारली चौकशी अहवाल प्राप्त नाही.माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिले.तेच उत्त्तर मी दिले. |
| मा.सभापती | :या बाबत प्रशासनाने माहिती घेऊन कार्यवाही करावी व स.सदस्यांना तशी माहिती दयावी. |
| श्री.गजानन बारवाल | :2 आक्टोंबर रोजी महात्मा गांधी जयंती आहे या दिवसापासून शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छता अभियांन संदर्भात  पत्र आले नुसार अभियांन राबवावे आवश्यक कर्मचारी वाहने दयावी. |
| मा.सभापती | :मा.महपौर यांचे दालनात बैठक झाली.आवश्यकतेनुसार व प्रभावीपणे या अभियानाची अमलबजावणी करावी. |
| श्री.रावसाहेब आमले | :वार्ड 15 मधील गट नं.129 मधील मनपाची आरक्षीत जागा शाळा, खेळाचे मैदान व शॉपींग सेन्टर व दवाखान्यासाठी रिझर्व जागा आहे.तेथे 20x30 प्लॉटीग होत आहे अनेकदा मी पत्र दिले कुणीही कार्यवाहीसाठी आले नाही. |
| मा.सभापती | :संबधीत अधिकारी यांनी तेथे जाऊन पाहणी करावी व त्वरीत कार्यवाही करावी. |
| श्री.मोहन मेघावाले | :डी मार्ट,.कोहीनूर कॉम्प्लेक्सची बांधकामा संबधीची माहिती विचारली दिली नाही.डी मार्ट च्या इमारतीचे 5 मजली बांधकाम होत आहे वाहने रोडवर लागतात पार्कीग नाही पाणीपुरीच्या गाडया रोडवर लागतात. नाल्यावर बांधकाम केले.ठोस काय निर्णय घेणार आहे. |
| श्री.नितीन चित्ते | :डी मार्ट तीन बैठकीपासून विषय निघतो परवानगी किती दिली पत्र दिले उत्तर दिले जात नाही तेथे पार्कीग नाही या विभागातील कर्मचारी बदली करावे.उत्त्तर मिळत नाही. सदस्यांना उत्तर वेळैवर दिले जावे. |
| उपअभियंता(न.र) | :स.सदस्य श्री.मेघावाले यांना नकाशाची प्रत दिली आहे.स.सदस्य मी स्वत: व प्रशासकीय अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊ ते इलिगल असेल तर प्रशासकीय अधिकारी यांना तशा सुचना दिल्या जातील. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | :उदया स्थळ पाहणी करावी व स.सदस्य यांना लेखी माहिती दयावी नियमबाहय काम होत असेल तर कार्यवाही करावी. |
| श्री.रावसाहेब आमले | :पडेगाव मध्ये सरोज शाळेचे अनधिकृत बांधकाम चालू  व चार मजले बांधकाम होत आहे. पत्र दिले कार्यवाही केली नाही. |
| मा.सभापती | :स सदस्याची तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करावी.सर्व प्रश्नाची उत्त्तरे योग्य वेळात त्यांना देण्याची कार्यवाही करावी. |
| श्री.कमलाकर जगताप | :मुकूंदवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ भाजीच्या गाडया उभ्या राहतात. रस्त्यावर अतिक्रमण केले पोलीस विभागातर्फे कार्यवाही केली होती पुन्हा गाडया उभ्या आहे. मनपाचे कुणीही कर्मचारी येत नाही. |
| मा.सभापती | :त्या ठिकाणचे अतिक्रमण त्वरीत काढावे. |
| श्रीमती ज्योती मोरे | :265 दै. वेतन कर्मचारी यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला का, नसेल पाठविला तर कारण काय? |
| आस्थापना अधिकारी-1 | :शासनाकडे प्रस्ताव पाठविला त्यानंतर शासनाने काही गाईड लाईन दिल्या त्याचा ही अहवाल पाठविला त्यानंतर पुन्हा आकृतीबंध सादर करण्याचे आदेशीत केले होते.आकृतीबंध हा प्रारूप तयार आहे. कक्ष अधिकरी यांचेकडे दिला होता त्याचे सुचना विचारात घेऊन आठ दिवसात मा.आयुक्ताच्या मान्यतेने शासनाकडे पुन्हा सादर करणार आहोत. |
| मा.सभापती | :ठिक आहे तात्काळ कार्यवाही करावी. |

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद